THE MET LEAGUE OF COLLEGES
**MET Bhujbal Knowledge City**
AS SHARP AS YOU CAN GET
Adgaon, Nashik - 422003 | Tel.: (0253) 2303515 | Mob.: +91 9881100099
e-mail : enquiries@bkc.met.edu | www.metbkc.edu.in
ISO 9001:2015 CERTIFIED
INSTITUTE OF TECHNOLOGY POLYTECHNIC
DTE CODE 5244

## We are Proud of our Alumni!!

## आम्हांला आमच्या विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे.






**Mr. Sagar Ajabe, Completed Diploma in Mechnaical Engineering from Batch 2011-12 MET's Institute of Technology-Polytechnic, Nashik and** Currently working as a **Assistant Inspector of Motor Vehicle (AIMV),** RTO Tardev, Mumbai

मोटार वाहन (परिवहन) विभाग म्हणजेच Regional Transport Office मध्ये Executive officials म्हणून प्रादेशिक परिवहन अधिकारी (Regional Transport Officer), उपप्रादेशिक परिवहन अधिकारी(Dy. RTO), सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (Asst. RTO), मोटर वाहन निरीक्षक (Inspector of Motor Vehicle) व सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक (AIMV) या पदांचा समावेश होतो. यातील सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी व सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक या अनुक्रमे वर्ग २ (गट- ब) व वर्ग ३ (गट क) पदांची भरती लोकसेवा आयोगामार्फत स्पर्धा परीक्षेद्वारे केली जाते. सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदासाठी राज्यसेवा आयोगाची स्पर्धा परीक्षा ही महाराष्ट्रातील कुठल्याही शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांना देता येते. * मेकॅनिकल, ऑटोमोबाईल, प्रॉडक्शन या शाखेतील पदविकाधारक विद्यार्थ्यांना लोकसेवा आयोगामार्फत प्रशासनात सहभागी होण्याची संधी फक्त सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक (AIMV) या परीक्षेद्वारे उपलब्ध होते.* नुकतेच आयोगाने त्यात मेकॅट्रॉनिक्स व पॅकेजिंग टेक्नॉलॉजी या मेकॅनिकलच्या उपशाखांचा समावेश केला आहे.

सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक या परिक्षेसाठी उमेदवाराने हलकी मोटर वाहने, जड मालवाहू वाहने व जड प्रवासी वाहने यांचे दुरूस्ती व देखभालीचा, पूर्णवेळ कर्मचारी म्हणून केंद्र अथवा राज्य शासनाच्या विभागामध्ये वा अंगीकृत व्यवसायांच्या अखत्यारीत कार्यशाळेतून घेतलेला, किमान एक वर्ष कालावधीचा अनुभव असणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे, गिअर्स मोटरसायकल, हलके मोटर वाहन आणि परिवहन वाहन यांचे वैध लायसन्स असणे आवश्यक आहे. तसेच पुरुष उमेदवारांसाठी उंची किमान १६३ से. मी. (अनवाणी) छाती किमान ७९से.मी.( प्रसरणाशिवाय) व किमान ५ से. मी. प्रसरण, तसेच महिला उमेदवारांसाठी उंची किमान १५५ से. मी. ( अनवाणी), वजन किमान ४५ किग्रॅ, अशी शारीरिक पात्रता असणे आवश्यक आहे.

आयोगाकडून सदर परिक्षा, पूर्व व मुख्य अशा दोन टप्प्यात घेतली जाते. पूर्व परिक्षा ही एकूण १०० गुणांसाठी, मराठी व इंग्रजी माध्यमातून, सामान्य ज्ञान , चालू घडामोडी व बुध्दीमत्ता चाचणी या स्वरूपात घेतली जाते. मुख्य परिक्षा ही फक्त इंग्रजी माध्यमातून, ३०० गुणांसाठी, अनुक्रमे मेकॅनिकल व ऑटोमोबाईल अभियांत्रिकी या दोन विभागात घेतली जाते, ज्यात मेकॅनिकल व ऑटोमोबाईल पदविका स्तरावरील, अभ्यासक्रमातील मुख्य विषयांचा समावेश असतो.

Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

म्हणूनच, परिवहन विभागात key role असणाऱ्या प्रशासनातील या महत्त्वाच्या पदाची परिक्षा, म्हणजे हुशार व कार्यक्षम तरूण तरुणींसाठी सुवर्ण संधीच असते .

श्री. सागर जगन्नाथ आजबे , हा मेट पॉलिटेक्निकचा, मेकॅनिकल विभागातील, शैक्षणिक वर्ष २०११ -१२ मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक परिक्षेत यशस्वी होऊन , सध्या प्रादेशिक परिवहन कार्यालय, ताडदेव , मुंबई येथे कार्यरत आहे . काही दिवसांपूर्वी विभागातील विद्यार्थ्यांना सदर स्पर्धा परीक्षेसंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी त्याला निमंत्रित केले होते , त्यावेळी त्याने आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या या स्पर्धा परिक्षेची विस्तृत माहिती, अभ्यासक्रम व अभ्यासाची पध्दत, संदर्भ ग्रंथ तसेच परीक्षेतील यशापयश , यावर विद्यार्थ्यांना स्वानुभवातून सोप्या व समर्पक शब्दांत माहिती दिली.

कष्ट, जिद्द, शिस्त व सातत्य या सर्वांचा मेळ साधत सागरने पहिल्याच प्रयत्नात परिक्षा उत्तीर्ण होऊन , प्रशासनात काम करण्याच स्वप्न साकार केल .

स्पर्धा परिक्षेच्या अभ्यासासाठी स्वाध्यायाचे महत्त्व अधोरेखित करून स्वतः, स्व अक्षरात, स्वतःच्या शब्दात, घोकंपट्टी न करता , विषय समजून घेऊन नोट्स काढणे हा कुठल्याही परिक्षेसाठी यशाचा मूलमंत्र त्याने विद्यार्थ्यांना सांगितला. स्पर्धा परीक्षा या केवळ महाविद्यालयीन टॉपर्स वा युनिव्हर्सिटी रँकर्सच उत्तीर्ण होऊ शकतात हा भ्रम, त्याने तो स्वतः त्याच्या महाविद्यालयीन काळात बैक बेंचर्स होता व पदवी परिक्षेत दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झाला होता , हे सांगून विद्यार्थ्यांमधील Winning spirit व प्रबळ इच्छाशक्तीमुळेच हे शिखर लवकर गाठता येते हे नमूद केले .

अभ्यासाबरोबरच शैक्षणिक कारकिर्दीत, विविध क्रिडा स्पर्धांतील सहभागाचाही आपल्या यशामध्ये महत्त्वाचा वाटा असल्याचा उल्लेख त्याने आवर्जून केला .

एकूणच , महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन , परिवहन विभागात रूजू झाल्यानंतर, सागरच्या व्यक्तिमत्वातील आत्मविश्वास, देहबोली व संभाषण कौशल्य यात आमूलाग्र बदल जाणवत होता. त्याने घेतलेल्या कष्टाचे, मेहनतीचे चीज झाल्याचा आनंद तर आहेच , त्याहीपेक्षा आपल्या यशाचे श्रेय तो आपल्या आईवडिल, शिक्षकांना देतो तेव्हा पाय जमिनीवर असल्याचे समाधान , हे तो संस्थेचा व विभागाचा माजी विद्यार्थी म्हणून जास्त महत्त्वाचे वाटते .

परिवहन विभागाच्या *"सेवा श्रध्दा समन्वित:"* या ब्रीदवाक्या प्रमाणे, त्यानेही निवडलेल्या क्षेत्रात समर्पित होऊन उत्तमता व प्रतिभा यांचा आविष्कार दाखवित, प्रशासनातील कार्यक्षम अधिकारी म्हणून नावलौकिक मिळवावा, ही मनपूर्वक शुभेच्छा.........

**अमोल पुरूषोत्तम वडनेरे**
विभाग प्रमुख, यंत्र अभियांत्रिकी विभाग,
मेट पॉलिटेक्निक, भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक.



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.